११९
५१२

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: एसएफएस-२०१७/प्र.क्र. १२९/एसएम- २**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक: ७ डिसेंबर, २०१७**

**प्रस्तावना -**

रॅडक्लिफ फौंडेशन, हरयाना संचलित रॅडक्लिफ स्कुल चारोली फाटा, आळंदी रोड, चोविसावाडी, दिघी, पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत रॅडक्लिफ फौंडेशन, हरयाना संचलित रॅडक्लिफ स्कुल चारोली फाटा, आळंदी रोड, चोविसावाडी, दिघी, पुणे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस प्राथमिक ते उच्च माध्यमिक ( इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी, राज्य मंडळ, इंग्रजी माध्यम) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता मान्यता देण्याबाबत खालील अटी व शर्तींची पुर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२. **अटी व शर्ती**

(१) संस्थेने प्रस्तावित शाळेसाठी रॅडक्लिफ फौंडेशन, हरयाना या संस्थेचे संस्था नोंदणी अधिनियम १९६० व सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत देण्यात आलेले संस्था नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेची घटना, लगतच्या ३ वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल, विहित निकषाची व मुदतीची मुदतठेव व संस्थेच्या नावाने किमान ४० आर जमिनीबाबतचा ७/१२ चा अद्ययावत उतारा / खरेदी खत / नोंदणीकृत बक्षिसपत्र किंवा जमीन भाडेकरारावर (लिज) असल्यास ३० वर्ष कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरार विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे ६ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची / तरतुदीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

(३) संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी ( इरादा पत्र) देण्यात येत आहे.

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा

Principal
RADCLIFFE SCHOOL
Pune - 412105

Radcliffe School Pune Dighi

ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबीची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहिल अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा ( स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण, इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा :- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा**" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने सर्व संबंधितांच्या "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३ सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( आ.ना.भोंडवे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Radcliffe School Pune Dighi

Principal
RADCLIFFE SCHOOL
Dighi, Pune - 412105

प्रत,
१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
७. निवडनस्ती (एसएम २).